# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

**क्र. मुमाआ/नों.क्र.२११५४४/२१/अ.क्र.४३४/२५/०१**
**क्र. मुमाआ/नों.क्र.२११५४५/२१/अ.क्र.४३५/२५/०१**

**श्री. जिग्नेश शर्मा**
जी-१, जोशी भवन, गोल गार्डन जवळ,
पोद्दार रोड, मालाड (पु), मुंबई ४०० ०९७.
**विरुद्ध**
**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि.) एल विभाग**
बृ.मु.म.पा. एल विभाग यांचे कार्यालय इमारत,
लक्ष्मणराव यादव मंडई, १ ला मजला, स.गो.बर्वे मार्ग,
कुर्ला (प.), मुंबई-४०० ०७०.
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता एल विभाग**
बृ.मु.म.पा. एल विभाग यांचे कार्यालय इमारत,
लक्ष्मणराव यादव मंडई, १ ला मजला, स.गो.बर्वे मार्ग,
कुर्ला (प.), मुंबई-४०० ०७०.
**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०८.०५.२०२५</u>**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित (प्रतिनिधी) |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | उपस्थित |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १७.०३.२०२० | - | २६.१०.२०२० | ०८.०२.२०२१ |
| १७.०२.२०२० | - | २६.१०.२०२० | - |

अपीलार्थी यांनी माहितीच्या अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १७.०३.२०२० रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "सन २०१९-२०२० या कालावधीमध्ये संपूर्ण एल विभागात सहाय्यक अभियंता श्री. तडेकर यांच्या सर्व बीट मध्ये ई-टेंडरची व सन २०१८-२०१९ मधील ट्रेंच कामाबाबत जी कामे झालेली आहेत, त्यांची संपूर्ण कागदोपत्रांची कार्यालयीन रेकॉर्डप्रमाणे पाहणी/निरिक्षण करुन देण्यात यावीत" याबाबत माहितीची मागणी केली आहे.

सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही.

त्यानंतर अपीलार्थी यांनी दि. २६.१०.२०२० रोजी कलम १९(१) नुसार प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे "जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही", असे कारण नमूद करुन प्रथम अपील अर्ज दाखल केला आहे. त्यावर "जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थी यांना नमूद अर्जातील मागितलेली माहिती निरिक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावी व त्यांना हवी असलेली माहिती विहीत शुल्क आकारुन १५ दिवसांच्या आत देण्यात यावी" असे आदेश पारित करुन प्रथम अपील अर्ज निकाली काढण्यात आला आहे.

तद्नंतर अपीलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) नुसार आयोगाकडे दि. ३०.०३.२०२१ रोजी "आजपर्यंत माहिती देण्यात आली नाही", असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

सदर द्वितीय अपीलावर आज दि. ०८.०५.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपीलार्थी यांनी कोणतीही पूर्व सूचना न देता अनुपस्थित आहे. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि.) एल विभाग यांचे प्रतिनिधी श्री. मंगेश पालवे, दुय्यम अभियंता (परि.) एल विभाग व विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता एल विभाग, श्री. सुरेश हातेकर उपस्थित आहेत.

आज सुनावणीच्या वेळी अपीलार्थी यांनी दि. ०६.०५.२०२५ रोजीच्या पत्रान्वये आयोगास कळविण्यात आले की, त्यांना जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि.) एल विभाग यांच्याकडून मागणी केलेली माहिती प्राप्त झाली असून माझे समाधान झाले आहे.

सदर प्रकरणी उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थी यांना यापुर्वीच प्रदान झाली असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता, प्रस्तूत व्दितीय अपील अंतिमत: नस्तीबध्द करण्यात येत आहे.

**आदेश**

**वरील दोन्ही अपिले निकाली काढण्यात येत आहे.**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : ०८.०५.२०२५**

State Information Commission Maharashtra

**( राहुल पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**